

अ/2660

संस्कृत साहित्य सरिता

वेणीसंहार

संस्कृत
साहित्य
सरिता
: १२

भट्टनारायण-कृत

वेणीसंहार

कथासार
अमरेन्द्र



वोरा ॲन्ड कंपनी, पब्लिशर्स (प्रायव्हेट) लि०

प्रकाशक :
एम्. के. वोरा
वोरा अँन्ड कंपनी,
पब्लिशर्स (प्रायव्हेट) लि०
३ राउंड बिल्डिंग,
काळबादेवी रस्ता, मुंबई २

किंमत सहा आणे
पहिली आवृत्ति : १९५६
सर्वाधिकार प्रकाशकाधीन

मुद्रक :
अनंत चिंतामण रायरीकर
'स्वस्तिक मुद्रणालय'
४३९ शनवार पेठ, पुणें २

संस्कृत-साहित्य-सरिता

विशाल महासागराला असंख्य नद्या येऊन मिळत असतात. अशा अगणित नद्यांनींच अमर्याद सागर बनलेला असतो. संस्कृत साहित्याचा महासागरहि असाच अनेक सरितांनीं समृद्ध झालेला आहे. ‘ संस्कृत-साहित्य-सरिता ’ असें नांव दिलेल्या या वाङ्मयमालेंतून आपली आदिभाषा जी संस्कृत तिच्यांतील उत्तम उत्तम वाङ्मयाचा कथारूपानें थोडक्यांत परिचय करून देण्याचें आम्ही योजिलें आहे. संस्कृत वाचणारे थोडे आणि समजणारे तर त्याहून कमी. तेव्हां आजच्या सर्वसामान्य माणसाला, लिहितां-वाचतां येऊं लागलेल्या नवशिक्षितालाहि या संस्कृत-वाणीचा आस्वाद कसा घेतां येणार ? परंतु त्यांना तो मिळणें तर आवश्यक आहे; कारण संस्कृत भाषेंतील वाङ्मय हा आपला फार थोर वारसा आहे. तो गमावणें म्हणजे सर्वस्वच गमावून बसणें. यासाठींच संस्कृत भाषेंतील थोर, प्रसिद्ध अशा वाङ्मयकर्तींचें, नाटकांचें आणि काव्यांचें, कथासार आम्ही वाचकांपुढें सादर करीत आहोंत.

आम्ही असें समजतों कीं, देवभाषेंतील या वाङ्मयीन कलाकृतींचा परिचय करून देण्याची आमची ही योजना एक चांगली योजना आहे—एक सत्संकल्प आहे. आणि असे सत्संकल्प उत्तम रीतीनें तडीला नेण्याचें काम जनताजनार्दनाचेंच आहे. तें तसें घडो, हीच इच्छा.

प्रकाशक

परिचय

‘ वेणीसंहार ’ नाटकाचा कर्ता भट्टनारायण हा कनोजी ब्राह्मण असून बंगाल्यांतील आदिसूर राजाच्या बोलावण्यावरून तिकडे गेला. त्या प्रांतांतील ब्राह्मणांचा हाच मूळपुरुष, अशी समजूत आहे. याचा काळ सातवें शतक समजला जातो.

या नाटकाचें कथानक महाभारतांतील यासंबंधींच्या कथानकावर आधारलेलें आहे, परंतु तें सर्वच्या सर्व महाभारतांतून उचललेलें मात्र नव्हे. नाटककारानें नाट्यगुणाच्या उत्कर्षासाठीं इष्ट असे फेरफार त्यांत केले आहेत. महाभारतांत नसलेली दुर्योधनाची पत्नी भानुमति आणि ‘ वेणीसंहारा ’चा प्रसंग हा केवळ कवीचा प्रतिभाविलासच आहे. दुर्योधनाशीं झालेल्या कपटद्यूतांत हरलेली पांडवपत्नी द्रौपदी दु:शासनानें कौरव-राजसभेंत वेणीला धरून फरफटत आणली; त्यावेळीं तिचे केंस जे सुटले ते तिनें बांधले नाहींत. ‘दुर्योधनाची मांडी फोडून त्याच्या रक्तानें माखलेल्या हातांनीं तुझी ही मोकळी सुटलेली वेणी मी बांधीन’ म्हणून भीमानें प्रतिज्ञा केली आणि ती महत्प्रयासानें शेवटास नेली. ‘ वेणीसंहार ’ म्हणजेच सुटलेले केंस एकत्र करून बांधणें.

“ कालिदासाच्या शाकुंतलाच्या खालोखाल ” या नाटकाची योग्यता कांहींजणांना वाटते; परंतु हें मत सर्वांना ग्राह्य होईल, असें दिसत नाहीं. सुरेख स्वभावरेखन हा या कवीचा गुणविशेष समजतां येईल; परंतु तितकाच पाल्हाळ हा त्याचा मोठा दोष म्हणतां येईल. “ या नाटकाचा मुख्य दोष म्हणजे त्याची नाट्यदुष्ट रचना ” हें एका विद्वान टीकाकाराचें मत यावर पुरेसा प्रकाश पाडूं शकतें.

—लेखक

वेणीसंहार

पांडवांशीं कपटानें चालविलेल्या द्यूतांत-जुगारांत कौरवांचा जय झाला. पांडवांना बारा वर्षें वनवासांत आणि एक वर्ष अज्ञातवासांत कंठण्याची पाळी आली. मोठ्या धैर्यानें त्याहि दिव्यांतून ते पार पडले. आणि हें सर्व पुरें करून जेव्हां ते प्रकट झाले तेव्हां साहजिकच कौरवांकडे त्यांनीं आपल्या राज्याची मागणी केली. परंतु दुर्योधन त्यांना राज्यच काय पण सुईच्या अग्रावर मावेल एवढी मातीहि देण्यास तयार नव्हता. यांतून भयंकर युद्ध उद्‌भवणार हें भगवान् श्रीकृष्णांना दिसत होतें. तेव्हां त्यांनीं स्वतःच शिष्टाईला जाऊन दुर्योधनाचें मन वळविण्याचा प्रयत्न केला. धर्मराज युधिष्ठिर तर पांच गांवें घेऊनहि स्वस्थ बसावयास तयार होता. परंतु गतकालांत कौरवांच्या हातून झालेल्या भयंकर अपमानांनीं व अन्यायांनीं इतर पांडव नुसते जळत होते. भीमाला तर तडजोडीची कल्पनाहि हास्यास्पद वाटत होती. अशा परिस्थितींत या नाटकाला प्रारंभ झाला आहे.

१ ***

भीमानें ऐकलें कीं श्रीकृष्ण कौरवांकडे तडजोडीचीं बोलणीं करण्यासाठीं गेले आहेत. नुसतें तें वृत्त ऐकूनच त्याचा संताप झाला. तो म्हणाला "ज्यांनीं लाखेच्या घरांत आम्हांला जाळायचा प्रयत्न केला, विषारी अन्न खायला घालून पाण्यांत बुडविलें, कपटी जुगार खेळून आम्हांला सर्वस्वीं नागविलें आणि जे सर्वथा आमच्या जीवितावर व वित्तावर उठले, इतकेंच नव्हे तर ज्यांनीं

पांडवपत्नीच्या वेणीला व वस्त्रालाहि हात घालावयाला कमी केलें नाहीं ते हे धृतराष्ट्राचे मुलगे मी जिवंत असतांना ऐषाराम भोगीत आहेत म्हणजे काय!" भीम भयंकर संतापला होता. त्यामुळें त्याच्या तोंडचे हे उद्‌गार ऐकून त्याच्याबरोबर असलेला सहदेव त्याला शांत करूं लागला. परंतु दोघांच्या संभाषणानें भीम शांत होण्याऐवजी सहदेवालाहि धर्माच्या मुळमुळीतपणाचा राग येऊं लागला. अखेर भीमानें म्हटलें कीं, "थोरल्या भावाची आज्ञा उल्लंघण्याचें पाप लागलें तरी चालेल पण आजच्या आज मी कौरवांविरुद्ध शस्त्र उपसणार." आणि म्हणून तो तावातावानें शस्त्रागाराकडे जाऊं लागला. परंतु रागानें बेभान झाला असल्यामुळें तो शस्त्रागाराऐवजीं द्रौपदीच्या निवासस्थानाकडेच वळला. सहदेवानें ही चूक त्याच्या लक्षांत आणून देतांच भीम म्हणाला "ठीक आहे, पांचालीचा निरोप घेऊनच जावें हें बरें."

परंतु द्रौपदी तेथें नसल्यामुळें त्यांना तेथें थोडा वेळ थांबावें लागलें. त्यावेळीं भीमाला समजलें कीं केवळ पांच गांवें घेऊन कौरवांशीं तह करण्यास आपले बंधुराज तयार आहेत. तें ऐकून तर तो हतबुद्धच झाला. धर्मराजाची निर्भर्त्सना करीत त्यानें म्हटलें, "खरोखरीं हा राजा द्यूतामध्यें आपलें क्षात्रतेजहि गमावून बसला आहे!"

इतक्यांत द्रौपदी तेथें येत असलेली सहदेवाला दिसली. ती आली ती अश्रु गाळीत आणि उसासे टाकीतच. त्याला कारणहि तसेंच घडलें होतें. सकाळींच द्रौपदी आपल्या सवतींसह गांधारीला नमस्कार करण्यासाठीं गेली होती.

तेथून परतत असतांना दुर्योधनाची पत्नी भानुमती तिच्याकडे पाहून म्हणाली कीं, "तुझे पति तर पांच गांवें घेऊन तह करावयास तयार झाले आहेत असें ऐकतें. मग आतां तूं आपली वेणी बांधत कां नाहींस?" या कुत्सित बोलण्यावर स्वतः द्रौपदीनें कांहींच उत्तर दिलें नाहीं; तिच्याबरोबर असलेली तिची दासी बुद्धिमतिका हिनें मात्र भानुमतीला चोख उत्तर दिलें. ती म्हणाली, "आपले केंस मोकळे सुटेपर्यंत आमच्या बाईसाहेब स्वतःची वेणी कशी घालतील?" हा सगळा प्रकार द्रौपदीच्या मनाला फारच लागला. त्या दुःखानेंच अश्रु ढाळीत ती आपल्या निवासस्थानाकडे परत आली होती.

भीम रागाच्या आवेशांत असल्यानें प्रारंभीं त्याचें लक्ष द्रौपदीकडे गेलें नाहीं. त्याचें सहदेवाशीं बोलणें चाललेलेंच होतें. तो म्हणत होता, "शत्रूचा नाश करण्याची जर धर्मदादांना लाज वाटते तर भरसभेंत स्वतःच्या पत्नीला दुसऱ्यांनीं केंस धरून फरफटत ओढीत आणलें त्याची कशी लाज नाहीं वाटली त्यांना?" द्रौपदीला भीमाचें हें फटकळ बोलणें ऐकून बरें वाटलें. पहिल्यापासून तिची आशा याबाबतींत भीमावरच होती. आपल्या भयंकर अपमानाचा सूड कौरवांवर उगवील तर हा आपला एकच पति, अशी तिची खात्री होती. अर्थात् धर्मराजाचा त्याला विरोध आहे हेंहि तिला माहीत होतेंच, तरीपण ती मनांतून जळत होती. सकाळीं भानुमतीनें केलेल्या ताज्या अपमानाची भर त्यांत पडली होती. त्यामुळें तिनें रागावलेल्या भीमसेनाला कौरवांवर सूड उगविण्याबाबत अधिक उत्तेजित

केलें. तेव्हां भीमानें द्रौपदीला उघड वचन दिलें कीं, "माझ्या या प्रचंड गदेनें सुयोधनाच्या मांड्या फोडून टाकून त्याच्या चिकट रक्तानें लाल झालेल्या हातांनीं हा भीम तुझी वेणी बांधील."

भीमाची ही भयंकर प्रतिज्ञा होते आहे तोंच स्वतः भगवान् श्रीकृष्ण कौरवांकडील शिष्टाई निष्फळ होऊन तिकडेच येत असल्याचें कंचुकीनें येऊन सांगितलें. त्यावेळीं दुर्योधनानें प्रत्यक्ष श्रीकृष्णालाहि पकडण्याचा प्रयत्न केला असें जेव्हां भीमाला समजलें तेव्हां तो उद्गारला, "या दुष्ट दुर्योधनानें आतां स्वतःच मर्यादेचें उल्लंघन केलें असल्यामुळें त्याचा सर्वनाश आतां ठरलेलाच आहे. आम्ही केवळ त्याला निमित्तमात्र होणार आहोंत!" आणि यापुढें 'एक तर कौरव तरी राहातील नाहींतर आम्ही तरी' असें निर्वाणीनें बोलून भीम द्रौपदीचा निरोप घेऊन युद्धावर निघाला.

२ ***

तहाचा प्रयत्न वांया गेला. अर्थातच लढाईशिवाय दुसरा मार्ग उरला नाहीं. युधिष्ठिरानेंहि युद्धाची तयारी चालू केली. आणि अखेर युद्धाचें यज्ञकुण्ड धडाडलें. त्यांत भीष्माचार्यांची आहुति पडली. बालवीर अभिमन्यूचाहि द्रोण, कर्ण, जयद्रथ, इत्यादिकांनीं त्यांत स्वाहाकार केला. अभिमन्यूच्या वधानें दुर्योधनाला मोठा हर्ष वाटला. उल्हसित अंतःकरणानेंच तो त्याची पत्नी भानुमती उद्यानांत होती तिकडे आला.

-३६०

भानुमती राणीला आदल्या रात्रीं एक अशुभ स्वप्न पडलें होतें. एका मुंगसानें शंभर साप ठार केल्याचें तिनें त्या स्वप्नांत पाहिलें होतें. त्यामुळें ती त्या अशुभाची शांति करण्याच्या उद्देशानें आपल्या सख्यांसह बागेंत आली होती. तेवढयांत राजाहि तेथें येऊन पोहोंचला. त्या स्वप्नामुळें राणी खिन्न झाली आहे असें पाहून दुर्योधनानें तिचें सांत्वन केलें. त्याचा स्वतःचाहि डावा डोळा फडफडूं लागून अशुभ सुचवूं लागला होता, त्याकडेहि त्यानें दुर्लक्ष केलें. राणीनें अशुभनिवारणासाठीं कांहीं व्रत करावयाचें ठरविलें होतें, तेंहि त्यानें तिला करूं दिलें नाहीं. इतकेंच नव्हे तर त्याच्या रथावरील ध्वजा भयंकर वाऱ्यामुळें मोडून पडल्याचें कंचुकीनें येऊन सांगितलें, त्याचाहि त्यानें तिरस्कार केला. तो आपल्या मनाची अशी समजूत करीत होता कीं, आपल्यासारख्या महाबलाढयांचें हीं अशुभें काय वांकडें करणार !

इतक्यांत वादळ सुरू झालें, त्यामुळें दुर्योधन भानुमती-सह अंतःपुरांत गेला. सिंधुदेशचा राजा जयद्रथ याची आई आणि त्याची पत्नी दुःशला या दोघी दुर्योधनाला भेटण्या-साठीं तेथें आल्या. त्या दोघीजणी अतिशय घाबरलेल्या होत्या. जयद्रथाच्या आईनें रडत रडतच दुर्योधनाला सांगितलें, ‘ पुत्रवधामुळें अर्जुनानें खवळून जाऊन प्रतिज्ञा केली आहे, कीं आज सूर्य अस्ताला जाण्यापूर्वीं जयद्रथाचा वध करीन, नाहींतर स्वतःच आगींत जळून भस्म होईन. तेव्हां आतां तूंच त्याचें रक्षण केलें पाहिजेस. ’

परंतु दुर्योधनाला अर्जुनाच्या या प्रतिज्ञेचें कांहींच वाटलें

नाहीं. तो तुच्छतेनें म्हणाला कीं, 'दुःशासनानें द्रौपदीचे केंस व पदर ओढला तरी ज्याचा पराक्रम जागा झाला नाहीं त्याच्या प्रतिज्ञेला काय किंमत द्यायची ! मी जयद्रथाचें रक्षण करायला उभा असतांना अर्जुनाची कसली भीति आहे ! आणि असें असूनहि ज्याअर्थीं त्यानें प्रतिज्ञा पुरी न झाल्यास आत्महत्त्या करण्याचें ठरविलें आहे त्याअर्थीं साऱ्या भावांसहित युधिष्ठिराचीहि हत्त्या झाल्यासारखीच आहे. शिवाय स्वतः जयद्रथ पांडवांपैकीं कोणाशींहि लढण्यास पुरेपूर समर्थ आहेच.' जयद्रथाच्या आईला व पत्नीला याप्रमाणें धीर देऊन दुर्योधन आपल्या जैत्र नांवाच्या रथांतून मोठ्या आवेशानें रणांगणाकडे निघून गेला.

परंतु अर्जुनानें भयंकर लढाई करून आपली प्रतिज्ञा पार पाडली. जयद्रथ सूर्यास्तापूर्वींच समरांत समाप्त झाला.

३ ***

युद्धकुण्ड धडाडतच होतें. घटोत्कचाचा बळी पडला. त्यामागून द्रुपद, मत्स्य, भूरिश्रवा, सोमदत्त, बाल्हिक इत्यादि मोठमोठे राजे आणि इतर असंख्य सामान्य सैनिक यांच्या समिधांनीं तें रणकुण्ड खचाखच भरून गेलें. प्रेतांचे खच पडले, मांसाचा चिखल झाला आणि रक्ताचे पाट वाहूं लागले. नरमांसभक्षक राक्षसांना मेजवानी होऊं लागली.

त्या दिवशीं द्रोणाचार्यांनीं सेनापति म्हणून रणांत प्रवेश केला. युद्ध सुरू होऊन थोडा वेळ लोटल्यानंतर

द्रोणपुत्र अश्वत्थामा तरवार परजीत रणांगणावर उतरला. परंतु कर्ण इत्यादि महारथी वीर रणांगणाकडे पाठ फिरवून परत निघालेले त्याला दिसले. सर्वत्र भयंकर कोलाहल माजला होता. आणि कौरवसैन्य भिऊन माघार घेंत होतें. अश्वत्थाम्यानें ती परिस्थिती पाहून रणांतून परत फिरणाऱ्या राजांचा धिक्कार केला, पळणाऱ्या सैन्याला धीर दिला. आणि सारथी रथ घेऊन येईपर्यंतहि वाट न पाहातां तो तसाच तडक युद्धभूमीकडे निघाला. परंतु लगेच त्याचा डावा डोळा फडफडूं लागून अपशकून सुचवूं लागला. तरीहि त्याकडे दुर्लक्ष करून तो पुढें झालाच.

सर्वत्र पळापळ चालू होती. त्याला हें समजेना कीं शत्रूच्या सैन्यरूपी समुद्रांत वडवाग्नीप्रमाणें प्रखर असलेले आपले वडील सेनापतीपदावर असतांना या सेनेनें युद्धांतून पळ कां काढावा ? कर्ण, कृप इत्यादि परत फिरणाऱ्या कौरववीरांना उद्देशून तो म्हणाला कीं, 'तिन्ही जगांत एकमेव धनुर्धर असलेले माझे वडील युद्धाच्या अग्रभागीं असतांना तुम्ही एवढे घाबरून पळत काय सुटलां आहांत ?' त्याचें तें वाक्य ऐकून कोणीतरी म्हणालें, "आतां कुठले तुझे वडील !"

अश्वत्थाम्याला वाटलें कीं कोणीतरी आपल्या वडिलांची हेटाळणी करण्यासाठींच हे शब्द उच्चारले असावेत. म्हणून त्यानें तसें बोलणारांचा निषेध केला. परंतु तेवढ्यांत द्रोणांचा सारथी अश्वसेन अश्वत्थाम्यासमोर येऊन उभा राहिला आणि त्याच्या तोंडून अश्वत्थाम्याला समजलें कीं आपले वडील मरण पावले. अश्रु ढाळीत व शोक

करीत त्यानें अश्वसेनाला विचारलें कीं, पराक्रमाचा समुद्रच असणाऱ्या माझ्या वडिलांना मृत्यु कसा आला ? भीम, अर्जुन किंवा प्रत्यक्ष श्रीकृष्ण यांशिवाय चौथा कोणीहि द्रोणाचार्यांना मारूं शकणार नाहीं अशी अश्वत्थाम्याची खात्री होती. परंतु त्यांपैकीं कोणाच्याहि हातून आपल्या वडिलांचा वध झालेला नाहीं हें कळून आल्यावर अश्वत्थामा अधिकच गोंधळांत पडला. नंतर त्याला द्रोणवधाची सर्व खरी हकीकत समजली. युधिष्ठिर सत्यवचनी म्हणून ख्यात होता. त्या युधिष्ठिरानें 'अश्वत्थामा मारला गेला' असें मोठ्यानें म्हटलें आणि नंतर हळूच 'हत्ती' असे शब्द उच्चारले. परंतु समोर रणावेशांत असलेल्या द्रोणाचार्यांना युधिष्ठिराचें फक्त पहिलेंच बोलणें ऐकूं आलें; पुढचा शब्द त्यांना समजला नाहीं. त्यामुळें द्रोणाचार्यांना वाटलें कीं अश्वत्थामा म्हणजे आपला मुलगाच ठार झाला. पुत्रशोकानें त्यांचें हृदय भरून येऊन त्यांनीं ताबडतोब हातांतलें शस्त्र खालीं टाकून दिलें. अश्वत्थाम्याला हें समजल्यावर तो अतिशय शोक करूं लागला.

एवढ्यांत कृपाचार्य उदासपणानें उसासे टाकीत तेथें आले. त्यांना द्रोणवध खरा कसा झाला हें प्रत्यक्ष माहीत होतें. शस्त्र टाकून द्रोणाचार्य शोकमग्न होऊन स्वस्थ बसले असतांना धृष्टद्युम्नानें त्यांचे केंस एका हातांत धरून दुसऱ्या हातानें तरवारीनें त्यांचें डोकें उडविलें होतें. परंतु ही वडिलांच्या भयंकर अपमानाची हकीकत अश्वत्थाम्याला कळली तर तो काय काय अनर्थ करील कोण जाणे, अशी

धास्ती कृपाचार्यांना पडली. मागें कौरवसभेंत द्रौपदीचे केंस ओढले गेले तेव्हां आणि आतां रणांगणावर द्रोणांचे केंस ओढण्यांत आले तेव्हां दोन्ही वेळच्या दुर्धर प्रसंगीं केवळ स्वस्थपणें पाहात बसण्याचें आपल्या नशिबीं आलें म्हणून कृपाचार्यांनीं स्वतःसारख्यांचा धिक्कार केला. त्यांना अशीहि भीति वाटली कीं पहिल्या द्रौपदीच्या 'केशाकर्षणा' चा जो भयंकर परिणाम झाला तो आपल्या डोळ्यासमोर युद्धरूपांत प्रत्यक्ष दिसतच आहे; तेव्हां या दुसऱ्या केशाकर्षणानें खरोखरी सर्व प्रजाच नष्ट होऊन जाणार कीं काय! त्यामुळें द्रोणांच्या या अपमानित वधाची कहाणी अश्वत्थाम्याला सांगायला त्यांचें मन कचरत होतें. परंतु अश्वत्थाम्याचे हे मामा शारद्वत कृपाचार्य जवळ येऊन उभे राहिल्यानंतर थोड्याच वेळांत अश्वत्थाम्याला पितृवधाची ती भयंकर हकीकत समजली. तोंवर पित्याला वांचवूं न शकल्यामुळें आणि आपल्यासाठीं त्यांनीं शस्त्र टाकून देऊन मरण ओढवून घेतल्यामुळें अश्वत्थामा जो स्वतःच्या हातांतीलहि शस्त्र टाकून देण्याला तयार झाला होता तो एकदम भडकला. त्यानें श्रीकृष्णापासून सर्व पांडवपक्षीयांना उद्देशून या दुर्घटनेबद्दल अपशब्द उच्चारले आणि आव्हानपूर्वक तो म्हणाला कीं, पूर्वी परशुरामानें स्वतःच्या वडिलांच्या मृत्यूचा सूड जसा भयंकर रीतीनें उगवला तसा मीहि उगवल्याशिवाय राहाणार नाहीं. लगेच त्यानें आपला महाहव नांवाचा सुसज्ज रथ आणण्यास सारथ्याला सांगितलें.

कृपाचार्यांनीं सुचविलें कीं तूं युद्धावर जाणें योग्य नि

आवश्यकहि आहे; परंतु यापुढें तूं कौरवसेनेचा सेनापति म्हणूनच समरांत उतरावेंस. कौरवराज दुर्योधन तुला सेनापतिपदाचा अभिषेक करण्याच्या तयारींतच असेल, असेंहि ते म्हणाले. अश्वत्थाम्यानें या गोष्टीला संमती दिली व ते दोघे दुर्योधनाकडे जावयास निघाले.

इकडे दुर्योधन व कर्ण युद्धांतून परत येऊन एका न्यग्रोध वृक्षाच्या सांवलीला बसून द्रोणवधाबाबतच चर्चा करीत होते. दुर्योधनानें कर्णाला म्हटलें, "तेजस्वी द्रोणगुरूंनीं केवळ पुत्रवधाची वार्ता ऐकून ऐन युद्धांत हातचें शस्त्र टाकून दिलें हें कसें? शेवटीं माणसाचा स्वभाव पालटत नाहीं हेंच खरें. ब्राह्मण शेवटीं जातीवरच गेला!"

कर्णाचें मन आचार्यांच्याविषयीं स्वच्छ नव्हतें. त्यानें त्यांच्यावर असा आरोप केला कीं, अश्वत्थाम्याला पृथ्वीचें निष्कंटक राज्य प्राप्त व्हावें अशी त्यांची इच्छा होती आणि म्हणूनच त्यांनीं कौरव-पांडवांच्या या महायुद्धांत राजकुळाचा संपूर्ण नाश व्हावा असें वर्तन केलें. परंतु मुलाला पृथ्वीचें सम्राटपद देण्याची आपली इच्छा जेव्हां साध्य होत नाहीं असें त्यांना आढळून आलें तेव्हां त्यांनीं आतां म्हातारपणीं आपल्यासारख्या ब्राह्मणानें हातीं शस्त्र धरून तरी काय करावयाचें या विचारानेंच शस्त्रत्याग केला.

कर्णाचें हें सांगणें दुर्योधनालाहि बरोबर वाटलें.

एवढ्यांत कृपाचार्य व अश्वत्थामा तेथें येऊन पोहोंचले. दुर्योधनानें कृपाचार्यांना नमस्कार करून अश्वत्थाम्याला आलिंगन दिलें व त्याचें सांत्वन करण्याचा प्रयत्न केला. परस्पर बोलणीं होत असतांना कर्ण म्हणाला कीं, "इतरांचें

रक्षण करण्याची जोखीम असलेल्या द्रोणाचार्यांनीं स्वतःच होऊन शस्त्रत्याग केला त्याला इतर कोण काय करणार ?" त्यावर अश्वत्थाम्यानें खवळून जाऊन प्रतिज्ञा केली कीं, " पांडवसेनेंतील सर्व शस्त्रधारी आणि पांडवकुळांतील सर्व आबालवृद्ध इतकेंच काय गर्भांत असलेले अंकुरहि, याशिवाय ज्यांनीं ज्यांनीं द्रोणवधाचें दुष्कृत्य पाहिलें असेल व रणांगणावर मला आडवा येणारा कोणीहि असेल; इतकेंच नव्हे तर सर्वांचा संहारक जो यम त्याचाहि संहार करण्याचें सामर्थ्य माझ्या ठिकाणीं आहे. आणि म्हणून ज्या याच ठिकाणीं परशुरामानें आपल्या पित्याच्या वधाचा भयंकर सूड उगवण्यासाठीं शत्रूच्या रक्तानें डोह भरले त्याच ठिकाणीं मीहि माझ्या पित्याच्या वधाचा सूड भयंकर रीतीनें उगविल्याशिवाय राहाणार नाहीं. "

दुर्योधनानें अश्वत्थाम्याच्या या म्हणण्याला दुजोरा दिला. तेव्हां कृपाचार्यांनीं म्हटलें कीं, " ज्याअर्थीं द्रोणपुत्रानें या युद्धाची जोखीम आपल्या शिरावर घेण्याची तयारी दर्शविली आहे त्याअर्थीं आतां तूं सेनापतिपद त्याच्याकडे द्यावेंस हेंच योग्य आहे. "

परंतु कृपाचार्यांनीं ही सूचना करण्यापूर्वींच दुर्योधनानें सेनापतिपद कर्णाला देण्याचें वचन देऊन टाकलें होतें. त्यामुळें त्यानें ती सूचना मान्य करण्यास आपण असमर्थ असल्याचें सांगितलें. तरीहि कृपाचार्यांनीं दुर्योधनाला गळ घालण्याचा प्रयत्न केला आणि अश्वत्थाम्यानें आपल्या पराक्रमानें त्या एका दिवसांत पांडव, कृष्ण व सोमकवंशीय इत्यादि सर्व राजे आपण नष्ट करून टाकूं अशी

बढाई मारली. तेव्हां कर्णानें त्याची हेटाळणी करून म्हटलें कीं, "हें बोलणें ठीक आहे पण त्याप्रमाणें करून दाखविणें मोठें कठीण आहे !" त्यावरून कर्ण व अश्वत्थामा यांच्यांत बोलाचाली वाढून एकमेक एकमेकांचीं उणींदुणीं काढूं लागले. "तूं सूतपुत्र, हीन कुळांतला" असें म्हणून अश्वत्थाम्यानें कर्णाला चिडविलें. त्यावर कर्णानें उत्तर केलें, "पांडवांच्या भीतीनें तुझ्या पित्यानें शस्त्र टाकून दिलें तसें मीं टाकलेलें नाहीं. आणि मी सूत असों नाहींतर सूताचा मुलगा असों; चांगल्या कुळांत जन्माला येणें हें नशिबावर अवलंबून असतें, परंतु पराक्रम ही मात्र माझ्या हातची गोष्ट आहे." वडिलांच्या या निंदेमुळें अश्वत्थाम्याला भयंकर राग आला व त्यानें कर्णावर लाथ उगारली. अखेर दोघेहि तलवारी उपसून हातघाईवर आले. तेव्हां दुर्योधन व कृपाचार्य यांनीं त्यांना मोठ्या कष्टानें आवरलें. आपल्या पक्षांतील नेत्यांशीं भांडत बसण्याची ही वेळ नव्हे, असें सांगून कृपाचार्यांनीं अश्वत्थाम्याचें सांत्वन केलें. तेव्हां अश्वत्थाम्यानें चिडून प्रतिज्ञा केली कीं, 'कर्ण जिवंत असेपर्यंत मी शस्त्र हातीं धरणार नाहीं.'

इतक्यांत प्रत्यक्ष रणमैदानावरून भीमाची गर्जना ऐकूं आली. तो दुःशासनाला उद्देशून म्हणत होता, "द्रौपदीचे केंस व वस्त्र ओढणाऱ्या हे महापातक्या ! नीचा ! तुझ्या हृदयांतील रक्त पिण्याची प्रतिज्ञा मीं केलेली आहे. आतां तूं माझ्या हातीं चांगलाच सांपडला आहेस. कौरवपक्षांतील कोणाची हिंमत असेल तर त्याला आतां करूं दे तुझें रक्षण."

ही गर्जना सर्वजणच ऐकत होते. तेव्हां अश्वत्थाम्यानें

कर्णाची हेटाळणी करून त्याला म्हटलें, " अंगराज, घोडा-मैदान समोरच आहे. आतां भीमाला दाखवा आपला प्रभाव ! "

कर्णहि लगेच दुःशासनाच्या मदतीसाठीं निघून गेला. परंतु अश्वत्थाम्यानें दुर्योधनाला म्हटलें कीं, भीम व अर्जुन हे कर्णाला आटोपण्यासारखे नाहींत, तेव्हां भावाच्या रक्षणासाठीं तुला स्वतःलाच गेलें पाहिजे. म्हणून दुर्योधनहि दुःशासनाला धीर देत रणांगणाकडे वळला.

परंतु एवढ्यांत भीमानें आपली प्रतिज्ञा शेवटास नेली होती. त्यानें दुःशासनाला ठार मारून त्याचें रक्त घटघटां प्यालें. भीमावर चालून येणाऱ्या कर्ण-दुर्योधनांना अर्जुनानें अडवून धरलें होतें. तें पाहून अश्वत्थाम्याला पुन्हां लढाईचा चेव आला. आपली शस्त्र धारण न करण्याची प्रतिज्ञा मोडूनहि तो लढाईवर जाण्यासाठीं शस्त्र हातीं घेण्याला तयार झाला. परंतु आकाशवाणीनें त्याला तसें न करण्या-बद्दल बजावलें. तेव्हां आपण रागाच्या भरांत केलेल्या प्रतिज्ञेबद्दल पश्चात्ताप पावून तो हळहळला आणि आपल्या शिबिराकडे परतला. कृप लढाईंत भाग घेण्यासाठीं निघून गेला.

४ * * *

युद्धाचें स्वरूप भीषण झालें. त्यांत कर्णाचा मुलगा वृषसेन व स्वतः कर्णहि कामीं आला. भीमाचें भयंकर स्वरूप पाहून कौरववीर हातचीं शस्त्रास्त्रें तेथेंच टाकून

पळत सुटले. दुर्योधनहि जखमांनीं बेशुद्ध झाल्यामुळें त्याच्या सारथ्यानें त्याला रणांगणापासून दूर नेलें. एका सरोवराजवळ नेऊन त्यानें रथ उभा केला.

इतक्यांत कर्णाचा सारथी सुंदरक दुर्योधनाला शोधीत तेथें येऊन पोहोंचला. तो रणांगणावरून परत येत होता.

दु:शासनाचा वध झालेला पाहातांच कर्ण भयंकर खवळला. त्यानें भीमावर चढाई केली. कर्णानें भीमाला हैराण करून टाकलें. तें पाहून अर्जुन आपल्या भावाच्या मदतीसाठीं धांवून आला. आणि भीमार्जुन दोघेहि आपल्या वडिलांशीं एकटचाशींच लढत आहेत असें पाहून कर्णपुत्र वृषसेन यानें आपला रथ तिकडे वळवला. परंतु अर्जुनानें थोडचाच वेळांत कुमार वृषसेनाचें शरीर छिन्नविच्छिन्न करून टाकलें.

आपला मुलगा मारला गेला हें पाहून कर्ण बेभान होऊन अर्जुनावर घसरला. परंतु अर्जुनाचे सारे भाऊ त्याच्या मदतीला आल्यानें कर्णाचा रथ निकामी होऊन त्याला परतावें लागलें. त्यानंतर त्यानें सुंदरकाला जवळ बोलावून त्याच्यापाशीं दुर्योधनाला देण्याकरितां म्हणून एक पत्र दिलें. त्या पत्राचा आशय असा होता कीं, 'मला मोठेपणा देऊनहि मी दु:शासन-वैरी भीमाला मारूं शकलों नाहीं. तेव्हां आतां एक तर तूं स्वत:च्या बळावर पांडवांचा नाश कर नाहींपेक्षां अश्रु ढाळून आपलें दु:ख निवारण कर.'

हें पत्र सुंदरकापाशीं देऊन कर्णानें जिवावर उदार होऊन जोहार करण्याचें ठरविलें. तें सुंदरकानें दुर्योधनाला

सांगितलें. तेव्हां दुर्योधनानें कर्णाला उलट निरोप पाठविला कीं, 'असलें साहस करूं नको. मीहि तुझ्याबरोबर येतों. जें कांहीं व्हायचें असेल तें आपणां दोघांचें एकदमच होऊं दे.' तो निरोप घेऊन सुंदरक निघून गेला.

एवढ्यांत दुर्योधनाचे आईवडील—गांधारी व धृतराष्ट्र-संजयासह रथांतून दुर्योधनाच्या भेटीसाठीं येतांना दिसलीं. त्या दिवशीं सकाळींच दुर्योधन आई-वडिलांना नमस्कार करण्यासाठीं गेला होता. तेव्हां त्याचा भाऊ दुःशासन त्याच्याबरोबर होता. त्यामुळें आतां दुःशासनाचा मृत्यु त्यांना कोणत्या तोंडानें सांगावा, या विवंचनेंत दुर्योधन पडला. परंतु कांहीं झालें तरी त्यांची भेट घेणें त्याला भागच होतें.

५ * * *

धृतराष्ट्र, गांधारी व संजय रथांतून उतरलीं व दुर्योधन न्यग्रोध वृक्षाच्या सांवलींत विश्रांति घेत बसला होता, तेथें आलीं. गांधारी व आंधळा धृतराष्ट्र यांनीं दुर्योधनाची विचारपूस केली. परंतु बराच वेळ दुर्योधन शरमून गेल्यामुळें कांहीं बोलेचना. नंतर तो म्हणाला, " भावंडांचा संहार मीं माझ्या उघड्या डोळ्यांनीं बघितला. तुमच्या दुःखाला मीच कारण झालों. इतकेंच नव्हे तर तुमच्या मुलांचा नाशहि माझ्यामुळेंच घडला. पवित्र भरतकुलामध्यें अपवित्र असा मी जन्माला आलों. अशा मला पाप्याला तुम्ही अजूनहि आपला पुत्र मानतां का ? "

पण गांधारीचें हृदय आईचें हृदय होतें. शंभरांतून एकटा उरला तरी तो तिचा मुलगा होता. त्यावरहि ती समाधान मानावयास तयार होती. राज्य किंवा जय याचीहि मातब्बरी तिला त्यापुढें नव्हती. त्यामुळें स्वतः गांधारीनें व आंधळ्या वृद्ध धृतराष्ट्रानेंहि दुर्योधनाला अगदीं कळवळून सांगितलें कीं हें युद्ध आतां पुरे! गांधारीनें तर त्याला हातहि जोडले! संजयानेंहि त्याला तसाच उपदेश केला. धृतराष्ट्रानें मुलाला सल्ला दिला कीं, तूं पांडवांशीं तह करावास.

परंतु मानी व हट्टी दुर्योधनाला तें मुळींच रुचण्यासारखें नव्हतें. आपली आई गांधारी पुत्रप्रेमामुळें असें म्हणत आहे, संजय खुळचट आहे आणि वडिलांना पुत्रशोकामुळें कांहीं समजण्याचें भान राहिलेलें नाहीं. असा निष्कर्ष काढून दुर्योधनानें तहाची सूचना फेटाळून लावली. शिवाय दुर्योधनाला अजूनहि अशी आशा वाटत होती कीं, आपण दुःशासनाच्या घोर वधाचा सूड उगवून गदायुद्धांतील आपल्या नैपुण्यानें भीमाला ठार मारूं.

याप्रमाणें दुर्योधनाचा लढाईवर जाण्याचा निर्धार झालेला पाहून त्याचे आईवडील अश्रु गाळूं लागले. इतक्यांत रणवाद्यांचा भयंकर आवाज व मोठा कोलाहल ऐकूं येऊं लागला. त्यामुळें घाबरून जाऊन धृतराष्ट्रानें दुर्योधनाला सुचविलें कीं, आतां निदान उघड युद्धाला न जातां शत्रूचा गुप्तपणें कपटानें घात कर. परंतु दुर्योधनाला तें शक्य व इष्टहि न वाटल्यानें त्यानें त्यालाहि नकार दिला. इतक्यांत

बातमी येऊन पोहोंचली कीं, कर्ण रणांत ठार झाला आणि शल्य रिकामा रथ घेऊन आपल्या शिबिराकडे परतला. अर्थातच यामुळें दुर्योधनाला फार दु:ख झालें. त्याचा कर्ण हाच एक आधार होता; तोहि आतां तुटून गेला. त्यामुळें त्यानें अगदीं धीर सोडल्यासारखें केलें. कर्णाचे गुण आठवून तो शोक करूं लागला. धृतराष्ट्र त्याचें सांत्वन करून त्याला धीर देऊं लागला.

हळुहळु सूताकडून दुर्योधनाला कळलें कीं, कर्णाच्या रथाचें चाक जमिनींत घुसलें असतांना अर्जुनानें त्याच्यावर बाण टाकून त्याला ठार मारलें. तें ऐकून दुर्योधन भयंकर संतापला व त्यानें असलें " नीच कृत्य करणाऱ्याचा कुलक्षय करण्याची " प्रतिज्ञा केली.

शल्य किंवा अश्वत्थामा यांना सेनापतिपद देण्याची सूचना दुर्योधनाला मानवली नाहीं. त्यानें स्वत:कडेच सेनापतित्व घ्यावयाचें ठरविलें व त्याप्रमाणें सारथ्याला रथ सज्ज करून आणावयास आज्ञा दिली.

परंतु एवढ्यांत दुर्योधनाचा शोध करीत त्याच्या भेटीसाठीं भीम व अर्जुन दोघेहि तेथें आले. त्यांनीं रीती-प्रमाणें गांधारी व धृतराष्ट्र यांना वडील म्हणून नमस्कार केला. परंतु त्यापूर्वीं भीमानें स्वत:ची ओळख देतांना आपला पराक्रम सांगितला तो धृतराष्ट्राला रुचला नाहीं. 'कौरवसंहारक, दु:शासनाचें रक्त पिणारा, सुयोधनाच्या मांडीचें चूर्ण करणारा' इत्यादि जें स्वत:चें वर्णन त्यानें धृतराष्ट्रापुढें केलें त्यामुळें धृतराष्ट्र संतापला व त्यानें

भीमाला टोमणा मारला कीं 'क्षत्रियांमध्यें तूंच तेवढा वीर आहेस असें नव्हे. क्षत्रियांत जित व जेतेहि असतातच.' त्यावर भीमानेंहि उलट धृतराष्ट्राला ऐकविलें कीं, 'आपल्या सभेंत पांडवांच्या पत्नीचा अपमान पाहाणाऱ्या म्हाताऱ्यानें माझ्या या बोलण्याचा राग मानण्याचें खरें कांहीं कारण नाहीं !'

त्या दोघांची याप्रमाणें बोलाचाली सुरू होतांच दुर्योधनानेंहि त्यांत भाग घेतला व मग भीम-दुर्योधन यांचें वाग्युद्ध सुरू झालें. शेवटीं भीमानें त्याला आव्हानपूर्वक सांगितलें कीं, "उद्यांच्या उद्यांच तुझी मांडी माझ्या गदाप्रहारानें फोडून टाकून तुला मी ठार करीन."

तोंवेळपर्यंत सूर्यास्त होऊं लागल्यानें धर्मराजानें त्या दिवसाची लढाई बंद करण्याची आज्ञा सोडली. त्यामुळें भीमार्जुन तेथून निघून गेले. ते गेले आणि अश्वत्थामा तेथें आला. कर्ण जिवंत असेपर्यंत शस्त्रधारण न करण्याची त्याची प्रतिज्ञा होती. कर्ण मृत्यु पावल्यामुळें त्यानें आतां आपले धनुष्य हातीं घेतलें होतें. आपण शस्त्रधारी नसल्या-मुळें आतांपर्यंत सारें रणमैदान शेळपटांनींच भरलेलें होतें; आपण आतां खरा पराक्रम दाखवून वडिलांच्या वधाचा सूड उगवूं, अशी बढाई तो मारीत होता !

परंतु दुर्योधनाला अश्वत्थाम्याविषयीं मुळींच आदर नव्हता. उलट त्याच्या कर्णद्वेषामुळें तो त्याचा तिरस्कारच करीत होता. त्यामुळें त्यानें त्याचा आदरसत्कार करून त्याला लढाईवर जाण्यासाठीं प्रोत्साहन देण्याऐवजीं टोंचून म्हटलें, "आचार्यपुत्र, कर्णाच्या मृत्यूची वाट पाहात होतांत

नाहीं का आपण? आणि त्यानंतर लढाईला उतरणार होतां. मग आतां माझ्याहि मरणाची वाट पाहा कीं! कारण मी आणि कर्ण यांत कांहीं तसा फरक नाहीं!"

असा उघड उपमर्द झाल्यानंतर अश्वत्थामा कसला तेथें थांबायला? तो "तथास्तु" म्हणून तेथून तडक चालता झाला. या प्रकाराबद्दल धृतराष्ट्रानें दुर्योधनाला दोष दिला. अशा बिकट प्रसंगीं बलाढ्य अश्वत्थाम्याला दूर लोटण्यांत तूं चूक करीत आहेस असें त्यानें मुलाला सांगून पाहिलें. परंतु तो आपलें ऐकत नाहींसें पाहून शेवटीं आपल्या कर्मालाच बोल लावीत तो उद्‌गारला, "भरतकुलाचा नाशच व्हावयाचा दिसतो, त्याला कोण काय करणार!" तरीपण त्यानें संजयाला म्हटलें कीं, 'अश्वत्थाम्याला त्याच्या लहानपणींची आठवण देऊन दुर्योधनाचीं दुरुत्तरें मनावर न घेण्याविषयीं सांग. आणि तसेंच आपल्या वडिलांच्या कपटवधाचा सूड उगविण्याच्या बाबतींत तूं दुर्योधनाच्या बोलण्यामुळें मागें सरूं नकोस, असेंहि त्याला माझें सांगणें कळव.' त्याप्रमाणें संजय अश्वत्थाम्याकडे निघून गेला आणि बाकीचीं सर्वजणें मद्रराज शल्याच्या शिबिराकडे जावयास वळलीं.

६ ...

पांडवांचा पक्ष भीष्मरूपी महासागर तरून गेला. त्यानें द्रोणरूप अग्नी शमविला, कर्णरूप महासर्प चेंचून टाकला, शल्याला स्वर्गलोकीं धाडिलें आणि जय त्याच्या अगदीं हाताशीं आला. असें असतांना साहसी भीमानें रागाच्या

सपाटयांत दुर्योधनाला गदायुद्धांत ठार मारण्याची प्रतिज्ञा केली. भीम व दुर्योधन हे दोघेहि बलरामापाशीं गदायुद्ध शिकलेले; पण दुर्योधन गदायुद्धांत अतिशय पटाईत होता. त्यामुळें एकप्रकारें धर्मराजाच्या मनांत भीमाला जय निश्चित मिळेल व त्याची प्रतिज्ञा पार पडेल किंवा कसें याबद्दल शंका वाटत होती. पांडवांपैकीं कोणाहि भावाचा युद्धांत मृत्यु घडून आल्यास आपण जिवंत राहाणार नाहीं, अशी प्रतिज्ञा स्वत: धर्मराजानें तर पूर्वींच करून ठेवली होती. त्यामुळें भीमाचें हें साहस अविचाराचें आहे असें त्याला वाटत होतें.

तशांत दुर्योधन कोठेंतरी लपून बसला होता. त्यामुळें तर धर्मराज अधिकच काळजींत पडला. त्यानें दुर्योधनाला शोधून काढण्यास सर्वत्र हेर पाठविण्यासाठीं सहदेवाला आज्ञा केली. स्यमंतपंचकाच्या आसपास दुर्योधनाच्या शोधासाठीं हेरांना बक्षिसें देऊं करण्यांत आलीं. पाण्यांत, चिखलांत, वाळवंटांत, अरण्यांत, दऱ्याखोऱ्यांत एवढेंच नव्हे तर ऋषिमुनींच्या आश्रमांतहि दुर्योधन लपून बसला असेल तर हुडकून काढण्यासाठीं गुप्तहेरांना सूचना देण्यांत आल्या.

कांहीं वेळांतच युधिष्ठिराकडे पांचालकानें बातमी आणली कीं, दुर्योधन सांपडला इतकेंच नव्हे तर भीमाची त्याच्याशीं लढाईहि जुंपली आहे. द्रौपदी व युधिष्ठिर यांनीं ती बातमी थोडयाशा भीतियुक्त मनानेंच ऐकली. अधीरपणानें त्यांनीं पांचालकाला तेथील समग्र हकीकत विचारली. पांचालक सांगूं लागला :

शत्रुपक्षाकडील शल्याला आपणच स्वर्गलोकीं धाडिलें. शकुनि इत्यादि गांधारदेशच्या राजांना सहदेवानें नष्ट केलें. त्यामुळें कौरवसैन्य निर्नायक होऊन पळत सुटलें. कृपाचार्य, कृतवर्मा व अश्वत्थामा हेहि समरांगणावर कोठें दिसेनात. आपल्या सैन्याचें रक्षण सेनापति धृष्टद्युम्न हे करीत होते. आपलें सैन्य विजयोन्मादानें पळणाऱ्या कौरवसेनेचा पाठलाग करीत होतें. अशा वेळीं भीमानें ती भयंकर प्रतिज्ञा केलेली समजतांच कौरवाधम दुर्योधन कोठेंतरी नाहींसा झाला.

दुर्योधन कोठें सांपडत नाहीं असें पाहून भीम व अर्जुन भगवान श्रीकृष्णासह एकाच रथावर बसून त्याच्या शोधासाठीं निघाले. सारें स्यमंतकपंचक त्यांनीं धुंडाळलें, पण व्यर्थ. त्यामुळें माझ्यासारखे सेवक कपाळाला हात लावून बसले. अर्जुन दीर्घ सुस्कारे टाकूं लागला, भीम आपली गदा परजूं लागला आणि भगवान वासुदेव दैवाच्या विपरीतपणाला बोल लावूं लागला. इतक्यांत एक कोळी धापा टाकीत भीमाजवळ येऊन उभा राहिला आणि कसेबसे शब्द उच्चारीत म्हणाला कीं, “राजकुमार, इथून जवळच एक सरोवर आहे. त्या सरोवराकडे गेलेल्या माणसाच्या पावलाचे माग दिसतात पण तिथून ते परतलेले मात्र आढळत नाहींत. यावरून तुम्हीच काय तें ठरवा.”

एवढी माहिती मिळतांच आम्ही सारेजण धांवतपळत त्या सरोवरापाशीं आलों. पाहातों तों दुर्योधनाच्याच पावलांच्या खुणा त्या सरोवरांत गेलेल्या स्पष्ट दिसत होत्या. त्यावरून श्रीकृष्णांनीं अनुमानानें सांगितलें कीं,

सुयोधनाला जलस्तम्भिनी विद्या येत असल्यानें तो नक्कीच या सरोवरांत दडी मारून बसला असला पाहिजे. तेव्हां भीमानें आपल्या हातांनीं त्या सरोवराचें पाणी जोरानें ढवळलें. त्यामुळें आंतील जलचर घाबरून गेलें. मग दुर्योधनाला उद्देशून भीमानें भयंकर गर्जना केली व म्हटलें कीं, " पांचाल-राजकन्येचे केंस व वस्त्र ओढणाऱ्या महा-पातक्या फुकट फुकट आहे तुझें पौरुष ! विशुद्ध चंद्रवंशांत जन्म तुझा. तूं हातीं गदा पेलतोस. दुःशासनाचें रक्त पिणाऱ्या माझ्याशीं वैर करतोस. मधुकैठभ दैत्यांचा वैरी जो श्रीकृष्ण त्याच्याशीं गर्वानें उद्धटपणाचें वर्तन करतोस. आणि हे नरपशु, आतां मात्र मला भिऊन लढाईंतून पळ काढून असा चिखलांत लपून बसतोस काय ?

" वास्तविक कौरव माझ्या हातून ठार झाल्यामुळें त्यांच्या स्त्रियांचे केंस आपोआपच मोकळे सुटले आणि त्यामुळें द्रौपदीचा राग बहुतेक शांत झाल्यासारखाच आहे. दुःशासनाच्या छातींतून गळणारें रक्त मी प्यालों हें पाहून तूं माझें काय वांकडें केलें आहेस कीं ज्यामुळें तुला या प्रसंगीं आपला स्वाभिमान सोडून असें दडून बसावेंसें वाटलें ! "

याप्रमाणें भीमानें नानाप्रकारें निर्भर्त्सना केल्यामुळें आणि भीमानें आपल्या गदेनें तें सरोवर तळापासून जोरानें ढवळण्यास सुरुवात केल्यामुळें अखेर दुर्योधनाचा नाइलाज झाला. मंदार पर्वताच्या रवीनें घुसळल्यामुळें क्षीरसमुद्रांतून काळकूट विष वर यावें त्याप्रमाणें भीमाच्या हातानें ढवळलेल्या त्या जलाशयांतून तो दुष्ट दुर्योधन वर आला. दोन्ही हातांनीं आपली गदा सांवरीत तो म्हणाला कीं,

" मी तुला घाबरून लपलों होतों असें मुळींच नव्हे. मी अद्यापि तुमचा नाश करूं शकलों नाहीं म्हणून लाज वाटल्यानें केवळ विश्रांतीसाठीं पाताळांत गेलों होतों. "

लगेच तेथें पाण्यांतच दोघांची जुंपली. परंतु अर्जुन व श्रीकृष्ण यांनीं 'पाण्यांत लढाई करणें बरोबर नाहीं,' असें समजावून त्या दोघांनाहि कांठावर आणलें. तेथें आल्यावर दुर्योधनानें आपली गदा खालीं ठेवली व तो जरा वेळ खालीं बसला. त्याच्या आसपास कौरवपक्षाकडील संहाराचें भीषण दृश्य दिसत होतें. त्याच्या मदतीसाठींहि येण्यासारखें कोणी त्यावेळीं तेथें नव्हतें. तेव्हां भीम म्हणाला, " कोणी साहाय्यक नाहीं म्हणून काळजींत पडण्याचें कारण नाहीं. आम्हां पांचांपैकीं हवें त्याच्याशीं तूं युद्ध कर. "

अखेर पांच पांडवांपैकीं भीमालाच दुर्योधनानें युद्धासाठीं पसंत केलें. आणि लगेच त्यांच्या भीषण गदायुद्धाला प्रारंभ झाला. श्रीकृष्ण तेथेंच होते; त्यांना खात्री होती कीं यांत भीमच जिंकील. म्हणून त्यांनीं पांचालकाच्या हातीं धर्मराजाकडे निरोप पाठविला कीं, " आतां तुला पृथ्वी निष्कंटक झाली. यापुढें कसलीहि शंका मनांत न बाळगतां मंगलोत्सव चालू करावेत. तुझ्या राज्याभिषेकाची तयारी सुरू कर. इतके दिवस मोकळी सोडलेली वेणी आनंदानें बांधावयास द्रौपदीला आतां कांहीं हरकत नाहीं. या दोघांच्या युद्धांतील भीमाच्या जयाविषयीं मला कसलीच शंका नाहीं. "

भगवान श्रीकृष्णाच्या सूचनेप्रमाणें धर्मराजानें सर्वत्र उत्सव चालू करण्याच्या आज्ञा सोडल्या.

भीम-दुर्योधनांचें गदायुद्ध चालू होतें. त्याकडे द्रौपदी व धर्मराज यांचें लक्ष होतेंच. त्याविषयीं उभयतांचें बोलणें चालू असतांनाच तहानेनें व्याकुळ झालेला एक मुनी तेथें आला. हा मुनी खरा मुनी नव्हता, तर त्यानें तो वेष धारण केलेला होता. तो खरा होता दुर्योधनाचा मित्र एक राक्षस आणि तो पांडवांना फसविण्याच्या उद्देशानें तेथें आला होता. त्यानें अशी बतावणी केली कीं आपण नुकतेंच स्यमंतपंचकांत चाललेलें अर्जुन-दुर्योधनाचें गदा-युद्ध पाहून इकडे आलों आहोंत. त्यानें एवढें सांगितल्या-मुळें धर्मराज-द्रौपदींनीं साहजिकच त्याला तिकडील सगळी सविस्तर हकीकत विचारली. त्या मुनिवेषधारी कपटी राक्षसानेंहि ती चांगली बनवून सांगितली. तो म्हणाला कीं:

प्रथम भीम व दुर्योधन यांचें गदायुद्ध सुरू झालें. इतक्यांत बलराम तेथें आले. त्यांचें प्रेम दुर्योधनावर अधिक असल्यामुळें त्यांनीं दुर्योधनाला खुणेनें एक पेंच सुचविला. त्याच्या बळावर दुर्योधनानें भीमाला ठार मारलें. तेव्हां अर्जुनानें भाऊ मारला गेला असें पाहून स्वतःच्या हातांतील गांडीव धनुष्य टाकून दिलें आणि मरून पडलेल्या भीमाच्याच मुठींतील रक्तानें भरलेली गदा आपल्या हातीं घेतली. आतां त्याचें दुर्योधनाशीं गदायुद्ध सुरू होणार हें पाहून बलराम श्रीकृष्णांना बरोबर घेऊन तेथून द्वारकेकडे निघून गेले. कारण दुर्योधन गदायुद्धांत अति प्रवीण असल्यामुळें व अर्जुनाला त्याचा तितका सराव नसल्यामुळें त्यांत अर्जुनाची इतिश्री होणार असेंच ते धरून चालले.

ही भयंकर हकीकत ऐकून प्रथम युधिष्ठिर दुर्योधनाशीं

लढण्यासाठीं निघाला, परंतु राक्षसानें त्याचें मन वळविलें. तेव्हां द्रौपदी व धर्मराज या दोघांनींहि चितेंत उडी टाकून आत्महत्त्या करण्याचा निश्चय केला. धर्मराज युद्धाला न जाता स्वतःला जाळून घेत आहे असें पाहून त्याच्या वृद्ध सेवकानें त्याला क्षत्रिय-धर्माची आठवण करून दिली. परंतु धर्मराजानें त्याच्याकडे दुर्लक्ष केलें. उलट तो द्रौपदीला म्हणाला, " हे पांचाल राजकन्ये, माझ्या विपरीत वागण्यामुळेंच खरोखरी तुझ्यावर हा दुर्धर प्रसंग ओढवलेला आहे. तेव्हां आतां आपण दोघेंहि एकाच वेळीं या अग्नींत प्रवेश करून आपल्या आवडत्या बंधूंच्या भेटीला जाऊं या. "

परंतु राजाचे नोकर चिता रचावयास तयार नव्हते. कंचुकी त्याला आत्महत्त्येपासून परावृत्त करीत होता. त्या मुनिवेषधारी राक्षसाचें काम मात्र झाल्यासारखें होतें. शिवाय आपल्याला कंचुकीनें ओळखलें असावें असा संशयहि त्याला आला. त्यामुळें तो तेथून निसटला आणि द्रौपदी-धर्मराजाची चिता पेटवून देण्यासाठीं एका बाजूला जाऊन लपून बसला.

द्रौपदी व धर्मराज यांनीं अखेरची निरवानिरव सुरू केली. द्रौपदीनें सासूबाईंना निरोप दिला. धर्मराजानेंहि आपल्या आईला आपल्या मृत्यूची वार्ता कळविण्यास दासीला सांगितलें. नकुल-सहदेवांच्या आज्ञेंत राहाण्या-विषयीं त्यानें सेवकांना बजावलें.

चितेंत प्रवेश करण्याच्या अगदीं ऐनवेळीं दुर्योधनाला ठार मारून त्याच्या रक्तानें माखलेला भीम तेथें आला.

रक्तानें व धुळीनें माखल्यामुळें तो अति भयंकर दिसत होता व ओळखूंहि येत नव्हता. त्यामुळें त्याला पाहून पांडवपक्षाकडील लोक सैरावैरा पळूं लागले. त्यांना आवरीत भीम म्हणत होता, " अहो, घाबरूं नका. मी कोणी भूतपिशाच्च किंवा राक्षस नाहीं. मोठी प्रतिज्ञा पार पाडलेला मी एक क्षत्रिय वीर आहें. पांचाली कोठें आहे तेवढें मला सांगा. "

परंतु भीमाच्या या बोलण्यामुळें अधिकच गोंधळ माजला. सर्वांना वाटलें कीं भीमार्जुनांचा वध करून त्यांच्या रक्तानें माखलेला हा दुर्योधनच द्रौपदीला पकडण्यासाठीं इकडे येत आहे. त्यामुळें मग कंचुकीहि द्रौपदीला चितेंत लवकर प्रवेश करण्याबद्दल सांगूं लागला. तेवढ्या वेळांत भीम अगदीं जवळ येऊन ठेपला. आतां द्रौपदीच्या रक्षणाचा कांहींच मार्ग दिसत नाहीं असें पाहून धर्मराजानें हातांनींच लढावयाचें ठरविलें आणि दुर्योधन समजून त्या भीमालाच करकचून मिठी मारली.

भीमाच्या ती गोष्ट लक्षांत येतांच तो धर्मराजाला म्हणाला कीं, "तुम्ही चुकून मला दुर्योधन समजत आहांत; मी भीम आहें. जरा सावध होऊन पाहा." त्याचें तें बोलणें ऐकन म्हातारा कंचुकी त्याच्याजवळ गेला. त्यानें ओळखलें कीं हा खरोखरीच भीम आहे. द्रौपदीच्या दासीनेंहि जवळ जाऊन स्वतःची तशी खात्री करून घेतली. परंतु तरीहि धर्मराजाला व द्रौपदीला विश्वास वाटेना. युधिष्ठिरानें " हें खरेंच का? हा दुर्योधन खरेंच नव्हे ना ?" म्हणून सेवकाला विचारलें तेव्हां स्वतः भीमानेंच त्याचें उत्तर

दिलें, " आतां कोठला दुर्योधन ? तो आतां नामशेष झाला. त्या दुष्टाचा देह धरणीवर आदळून त्याच्या रक्ताचेंच हें चंदन मी माझ्या अंगाला फांसलें आहे. चारी समुद्रांनीं वेढलेल्या या पृथ्वीचें सारें राज्य आतां तुमच्या पायाशीं आलेलें आहे. या धडाडलेल्या रणकुंडांत कुरुकुलाची त्याच्या परिवारासह आहुति पडलेली आहे. "

हें ऐकल्यावर धर्माला धीर आला व त्यानें भीमाला आपल्या वेंगेंतून सोडलें. भीमानें भावाच्या पायावर मस्तक ठेवीत त्याला नमस्कार केला. तेव्हां धर्मानें त्याला विचारलें कीं अर्जुन सुखरूप आहे ना ? अर्थातच भीमानें होय म्हटलें. तेव्हां धर्मराज त्याला प्रेमभरानें पुन्हां हृदयाशीं धरीत त्याचें अनेक प्रकारें कौतुक करूं लागला. त्यावर भीमानें म्हटलें कीं, " मला आपल्या मिठींतून जरा मोकळा करा. एक महत्त्वाचें काम अजून करावयाचें राहिलेलें आहे. सुयोधनाच्या रक्तानें माखलेल्या या माझ्या हातांनीं दुःशासनानें ओढलेले द्रौपदीचे केंस मला बांधूं द्या. "

त्यानंतर धर्माच्या अनुज्ञेनें भीम द्रौपदीजवळ जाऊन म्हणाला, " अग, मला पाहून घाबरलीस ! मी तर तुझ्यापाशीं केलेली प्रतिज्ञा पुरी करून तुला बरें वाटावें म्हणून आलों आहें. शत्रूचा कुलक्षय झालेला आहे. ज्या नरपशु दुःशासनानें तुला राजसभेंत फरफटत आणली त्याचें रक्त या माझ्या हातांना चांगलें चोपडलेलें आहे. तसेंच तुझ्या त्या अपमानरूपी अग्नीचा भडका शांत करण्यासाठीं कौरवराज दुर्योधनाची मांडी या गदेनें फोडून त्याचेंहि रक्त मी माझ्या अंगाला फांसलेलें आहे. आणि

तुला हंसणारी ती भानुमती आतां कोठें गेली !"

भीमानें द्रौपदीला आपल्या पूर्वी केलेल्या प्रतिज्ञेची आठवण दिली. "दुर्योधनाची मांडी स्वत:च्या गदेनें फोडून त्याच्या रक्तानें माखलेल्या हातांनीं मी तुझी मोकळी सुटलेली वेणी घालीन" अशी ती भीमाची प्रतिज्ञा होती. ती तुला आठवते का म्हणून भीमानें विचारतांच द्रौपदी झटकन उत्तरली, "नुसती आठवतेच काय! प्रत्यक्ष अनुभवच घेत आहें मी तिचा !"

कुरुकुलाला काळरात्रीप्रमाणें असलेली द्रौपदीची ती वेणी भीमानें प्रतिज्ञेप्रमाणें बांधली.आकाशांतील सिद्धांनींहि या 'वेणीसंहार'-समारंभाला आशीर्वाद दिला. इतक्यांत अर्जुनासह भगवान श्रीकृष्ण तेथें आले. त्यांनीं सर्व शत्रु नष्ट झालेल्या व आपल्या भावांसह सुखरूप असलेल्या धर्मराजाचें अभिनंदन केलें. दुर्योधनाचा मित्र चार्वाक राक्षस मुनिवेषानें धर्मराजाकडे आल्याची वार्ता श्रीकृष्णांना समजली म्हणून ते तांतडीनें तेथें आले होते. नकुलानें त्या राक्षसाला पकडलेंहि होतें. तेव्हा श्रीकृष्णांनीं धर्मराजाला विचारलें कीं, आतां तुझी आणखी काय इच्छा आहे? धर्मराज म्हणाला, "साऱ्या शत्रुकुलाचा संहार झाला असून आम्ही पांचहिजण मात्र सुरक्षित आहोंत. माझ्या दुष्परिणामी राजनीतीमुळें द्रौपदीला ज्या अपमानाच्या समुद्रांत गटंगळ्या खाव्या लागल्या तोहि आतां ओलांडला गेलेला आहे. आणि तूं स्वत: भगवान पुरुषोत्तम मला उत्तम आशीर्वाद देऊन मला गौरवून माझ्याशीं बोलत आहेस,यापेक्षां मी आणखी काय मागणार? मी संतुष्ट आहें."

संस्कृत साहित्य सरितेचीं पुस्तकें

१२

१. रघुवंश
२. शाकुन्तल
३. विक्रमोर्वशीय
४. मृच्छकटिक
५. प्रतिमा
६. महावीरचरित
७. उत्तररामचरित
८. मालतीमाधव
९. स्वप्नवासवदत्ता
१०. दशकुमारचरित । भाग १
११. दशकुमारचरित । भाग २
१२. वेणीसंहार
१३. कुमारसम्भव
१४. मालविकाग्निमित्र
१५. हर्षचरित
१६. नागानंद
१७. पंचरात्र
१८. रत्नावली
१९. कादम्बरी
२०. मेघदूत
२१. शिशुपालवध
२२. किरातार्जुनीय
२३. बुद्धचरित
२४. मुद्राराक्षस
२५. प्रतिज्ञायौगंधरायण
२६. अविमारक
२७. अभिषेक
२८. मध्यमव्यायोग
२९. कर्णभार
३०. उरुभङ्ग
३१. पार्वतीपरिणय
३२. नलोदय

A/370

प्रत्येकीं किंमत ६ आणे

६ आणे

वोरा ॲन्ड कंपनी पब्लिशर्स प्रायव्हेट लि०

